शिर्षदि प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना　　**P.S.(ठाणे):** जाफराबाद　　**Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0083　　**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/04/2021 02:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार　　**Date From (दिनांक पासून):** 05/04/2021

**Time Period (कालावधी):** पहर 6　　**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/04/2021

**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/04/2021　　**Time (वेळ):** 01:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003　　**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/04/2021 01:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 08 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भराडखेडा फिर्यादीच्या घरात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गजानन माणिकराव गावंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980　　(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**　　**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भराडखेडा,जाफराबाद,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भराडखेडा,जाफराबाद,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अगतराव श्रीधर वीर तलाठी | | | 1. तलाठी सजा बोरगाव फदाट,तहसिल, जाफ्राबाद वर्ग-3 रा डोळी ,ता जि उस्मानाबाद,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | आकाश संजय वाघ खाजगी ईसम | | | 1. बोरगाव मठ,,जाफराबाद,जालना, महाराष्ट्र,भारत<br>2. बोरगाव मठ,,जाफ्राबाद,जाफराबाद, जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 40,000/ रुपये लाचेची रक्कम न्धासिन पावडर लागलेली . | 40,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 40,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादलाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना दिनांक 06.04.2021.मी गजानन माणिकराव गावंदे, वय 41 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. भराडखेडा,ता. जाफ्राबाद, जि.जालना.मोबाईल क्रमांक 9309591895.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, मी आज दि. 05.04.2021 रोजी मोबाईल फोन व्दारे पोलीस अमंलदार श्री. कृष्णा देठे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांना कळविले की, मला जाफ्राबाद तहसिल कार्यालयातील एक तलाठी लाचेची मागणी करीत आहेत. त्यावरुन ते म्हणाले की, मी व पोलीस निरीक्षक श्री ताटे साहेब, पंच व स्टाफसह आपणांस भेटण्यासाठी जाफ्राबाद येथील न्यु हायस्कुल जाफ्राबाद या शाळेच्या परीसरात सुरक्षित ठिकाणी येतो असे बोलणे झाल्यानंतर ते काही वेळात ठरलेल्या ठिकाणी श्री संग्राम ताटे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना तसेच तेथील स्टफ व दोन पंच असे कृष्णा देठे यांचेसोबत आले व त्यांनी माझा परिचय करुन त्यांचा परिचय दिला. त्यानंतर मी माझी तक्रार पंचासमक्ष त्यांना दिली ती, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व वाळु व्यवसाय करतो. दिनांक 04.04.2021 रोजी दुपारी माझा महिंद्रा कंपनीचे ट्रक्टर नं.एम एच 21 बी एफ 9184 यांने रयल्टीने डावरगाव देवी गावाजवळील पुर्णा नदीतुन वाळु भरुन भारज या गावी घेवून जात असतांना बोरगाव मठ या गावाजवळील रोडवर जाफ्राबाद तहसिल कार्यालयाचे तलाठी श्री. वीर व त्यांचे सोबत असणारे श्री आकाश वाघ यांनी माझा ट्रक्टर अडविला. त्यावेळी आम्ही त्यांना रयल्टीची पावती दाखवली परंतु त्यांनी रयल्टीची पावती असुन देखील त्याला काहीएक न जुमानता तलाठी श्री विर मला म्हणाले की, तुम्हाला तुमचे ट्रक्टर चालवायचे असेल तर मला साठ हजार रुपये आत्ताच आणून द्या नाहीतर मी तुमचा ट्रक्टर चालु देणार नाही. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, आता माझ्या जवळ पैसे नाही मी उद्या आणुन देतो. असे म्हणाल्यावर त्यांनी माझ्याजवळ असलेली होंडा कंपनीची युनीकर्न गाडीची चाबी घेतली व मला म्हणाले की, आता मी तुमचा ट्रक्टर सोडतो व ही मोटारसायकल घेवून जातो, तुम्ही उद्या मला 60,000 रु आणुन द्या व तुमची गाडी घेऊन जा असे म्हणून तलाठी श्री. वीर यांनी माझी मोटार सायकल आकाश वाघ यांस घेण्यास सागिंतली. त्यावेळी मी माझी गाडी श्री आकाश वाघ यांस परत देण्याबाबत विंनती केली असता तो हि मला म्हणाला कि, तुम्ही 60,000 रु आणुन दया अस म्हणुन माझी मोटार सायकल घेवुन निघुन गेले○. त्यानंतर तलाठी श्री वीर व त्यांचे सोबत असलेले इसम श्री आकाश वाघ हे

मला वारंवार फोन करुन म्हणु लागले कि, आम्ही मागणी केलेले 60,000/- रु आणुन दया व तुमचा वाळुच्या ट्रक्टरची वाहतुक करा व तुमची मोटार सायकल घेवुन जा असे म्हणत आहेत. माझी जाफ्राबाद तहसिल कार्यालयातील तलाठी श्री. वीर साहेब व त्यांचे सोबत असणारे श्री आकाश वाघ यांना लाच देण्याची इच्छा नाही परंतु त्यांना लाच दिली नाही तर ते माझा ट्रक्टर वाळुवर चालु देणार नाहीत व माझी मोटार सायकल परत देणार नाहीत. तलाठी श्री. वीर व त्यांचे सोबत असणारे श्री आकाश वाघ यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही.तलाठी श्री. वीर व त्यांचे सोबत असणारे श्री आकाश वाघ हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी आज रोजी जाफ्राबाद तहसिल कार्यालयात तलाठी श्री. वीर व त्याचे सोबत असणारे श्री आकाश वाघ यांना भेटण्यासाठी जाणार असुन त्यावेळी मी त्यांना माझे वाळुचे ट्रक्टर चालु करण्याबाबत व माझी मोटार सायकल परत देण्याबाबत बोलणी करणार आहे. त्यावेळी तलाठी श्री.विर व श्री आकाश वाघ यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून कार्यवाही करावी. वगैरे मजकुरची तक्रार दिली.त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.ताटे यांनी आज दिनांक 05.04.2021 रोजी माझी तक्रार लेखी व टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगीतली. माझ्या तक्रारीवरुन मी जाफ्राबाद तहसिल कार्यालयाचे तलाठी श्री. वीर व त्यांचे सोबत असणारे इसम श्री आकाश वाघ यांचे विरुध्द केलेली तक्रार खरी आहे काय व तलाठी श्री. वीर व त्यांचे सोबतचे इसम श्री आकाश वाघ हे माझ्याकडे लाच मागतात काय, याची खात्री करण्यासाठी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला व पंच 1. श्री. अवसेकर यांना तलाठी श्री. वीर व त्याचे सोबतचे इसम श्री आकाश वाघ यांना भेटण्यासाठी जाफ्राबाद तहसिल कार्यालयात भेटण्यासाठी पाठविण्यात आले. त्यावेळी माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते. त्यावेळीचे भेटीमध्ये मी तलाठी श्री. वीर यांना भेटण्यासाठी गेलो असता त्यांचेसोबत आकाश वाघ हे होते. त्यावेळी तलाठी श्री. वीर म्हणाले की, आकाश सोबत बोलण करुन घ्या व त्याच्याजवळ पैसे द्या असे म्हणाल्यावरुन तेथे उभा असलेला आकाश मला साठ हजार रुपये लाचेची मागणी करु लागला तेंव्हा मी त्याला म्हणालो की मी तुझ्यासोबत नाही बोलत मला तलाठी साहेबांशी बोलायचे आहे. त्यावरुन मी लगेच तलाठी श्री. वीर यांना भेटलो असता ते मला म्हणाले कि, तुमचा ट्रक्टर पकडणार नाही तुम्ही साठ हजार रुपये द्या व ते आकाश वाघ यांचेजवळ दया अशी लाचेची मागणी करुन लाच स्वीकारणार असल्याचे निष्पन्न झाले. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मला श्री ताटे साहेब,ला.प्र.वि.जालना येथील स्टफ व नमुद पंच यांचे समक्ष श्री आकाश वाघ याचा माझ्या मोबाईलवर फोन आला व त्याने सांगीतले की, मी पैसे घेण्यासाठी तुमच्या गावी तुमच्या घरी येणार आहे तुम्ही पैसे तयार ठेवा असे कळविल्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी माझे भराडखेडा गावातील घरी सापळा लावण्याचे ठरवले. त्यानंतर जाफ्राबाद येथुन माझ्या भराडखेडा गावात माझ्या घरामध्ये आलो. तेथे सुरक्षित ठिकाणी अंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लम्प यांची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. तलाठी श्री. वीर व श्री वाघ यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडील पैशातुन 40000/- रु वेगळे काढले व त्याला अंथ्रासीन पावडर लावली द ते पैसे माझ्या पन्टच्या डाव्या खिशात ठेवले. सापळा पथकातील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. त्यानंतर मला पोलीस निरीक्षक श्री ताटे साहेब यांनी मला सुचना दिली की, लाच स्वीकारल्यानंतर तुम्ही तुमच्या डोळ्यावरचा चष्मा काढुन उजवा हात डोक्यावरुन फिरवायचा असे सांगीतले. याबाबतचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी व पंच नं 1. श्री. अवसेकर असे माझ्या घरात थांबलो. तेथेच पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व स्टाफ तसेच पंच क्र. 2. पठाण अशांनी सर्वांनी मिळून सापळा लावला सर्व जण एकमेकांना दिसतील, अशा प्रकारे थांबले. तेव्हा मी व पंच क्रमांक 1. श्री. सौरभ अवसेकर असे मौजे भराडखेडा येथे माझ्या घरात बसलेले असतांना आकाश वाघ हे माझ्या घरी आले व त्याने माझ्याकडून 16.30 वा. सुमारास 40,000/- रुपये लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हातात घेऊन स्वीकारली व त्यांचे पन्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी पंच 1. श्री. सौरभ अवसेकर हे समक्ष हजर होते. त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे दर्शनी भागात येवुन इशारा केला, तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. असीफ खान पठाण असे लगेच त्याठिकाणी येवून आकाश वाघ यास पकडले व त्यास त्यांची स्वत:ची व सर्वांची ओळख करुन दिली. तेंव्हा त्यांनी त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव आकाश संजय वाघ, रा. बोरगाव मठ ता. जाफ्राबाद येथील राहणारा असुन तलाठी श्री. वीर यांनी सांगीतल्यावरुन लाच स्विकारल्याचे सांगीतले. तेव्हा त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम 40,000/- रुपये पंच क्र 2 श्री. असिफ पठाण यांना ताब्यात घेण्यास सांगितले. मला पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी माझ्या घराचे बाहेर बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री. कृष्णा देठे यांनी बंद केला व माझे हात तपासण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, स्टाफ, दोन्ही पंच, मी व श्री आकाश वाघ यांना सोबत घेवुन तलाठी श्री. वीर यांना देखील जाफ्राबाद येथुन ताब्यात घेतले व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे आलो. सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी दिनांक 05.04.2021 रोजी जाफ्राबाद तहसिल कार्यालयाचे तलाठी श्री. वीर व त्यांचे सोबत असणारे खाजगी इसम श्री आकाश वाघ यांनी माझ्याकडे ट्रक्टरमधुन वाळु वाहतूक करण्यासाठी व माझी मोटारसायकल सोडण्यासाठी माझ्याकडे 60,000/- रुपये लाचेची मागणी करुन आज रोजी दुपारी 16.30 वा. मौजे भराडखेडा येथे माझ्या घरात खाजगी इसम श्री आकाश वाघ यांनी पंच 1 श्री. सौरभ अवसेकर यांचे समक्ष 40,000/- रुपयेची लाच स्विकारली, तेव्हा त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.गजानन माणिकराव गावंडे

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): RAVINDRA DEVIDAS NIKALJE
**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): PI **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): RAMESH BAJIRAO JAYABHAYE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PCMAH85560